**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.०३/०९/२०२६

क्रीडा विभाग

*मा.महापौर महोदयांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धाचे नियोजनाबाबत प्रशिक्षण शिबीर संपन्न*

वसई विरार शहर महानगरपालिका आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२६-२७ चे आयोजन करण्याकरिता व स्पर्धेचे प्रवेश अर्ज ऑनलाइन पद्धतीने भरणे यासंदर्भात माननीय महापौर महोदय, श्री.अजीव पाटील यांचे अध्यक्षतेखाली गुरुवार, दिनांक ०३ सप्टेंबर २०२६ रोजी महानगरपालिका मुख्यालयातील सभागृहात विशेष प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले.

या प्रशिक्षण शिबिरात सन २०२६-२७ च्या महानगरपालिकेमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे नियोजनासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच जिल्हास्तरीय स्पर्धेची रूपरेषा ठरविण्यात आली. शिबिरात मा. महापौर यांनी क्रीडा शिक्षक यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यावर उपाययोजना करण्याचे निर्देश दिले व कोणत्याही समस्या आढळून आल्या तर महापालिकेच्या वतीने योग्य ते सहकार्य केले जाईल असे आश्वासन देण्यात आले. सदर कार्यक्रमात राष्ट्रीयस्तरावर प्राविण्याप्राप्त खेळाडू 1) मानसी गायकवाड, 2) संस्कार बिरवटकर, 3) प्रग्नय शिंदे यांचे मा. महापौर महोदय यांचे शुभ हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. तदनंतर सदर स्पर्धांचे प्रवेश अर्ज ऑनलाइन पद्धतीने भरणे संदर्भात क्रीडा शिक्षकांना व संबंधितांना शिबिरात प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षण शिबिरास मा. महापौर महोदय श्री. अजिवजी पाटील, मा.सभागृह नेते श्री.प्रफुल साने, मा.आरोग्य समिती सभापती श्री. निलेश देशमुख, मा.उप-आयुक्त (क्रीडा) श्री.अजित मुठे, पालघर जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.सुहास व्हनमाने माने, सहायक आयुक्त (क्रीडा) श्रीम.निता कोरे, पालघर तालुका क्रीडा अधिकारी श्री.गिरीश इरनाक, जिल्हा क्रीडा प्रमुख श्री.योगेश चौधरी, प्रमुख सल्लागार श्री.गोविंद शिंदे, श्री.माणिक दोतोंडे, तसेच सर्व शाळेचे क्रीडा शिक्षक व मनपा अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.